
# प्रकरण - २ रे

## बार्शी तालुक्याची तोंडओळख

### २.१ भौगोलिक स्थान आणि प्राकृतिक रचना

सोलापूर जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या आग्नेय दिशेला असून त्याचे भौगोलिक स्थान १७$^0$ ते १९$^0$ उत्तर अक्षांश तर रेखावृत्तीय विस्तार ७५$^0$ ते ७७$^0$ पूर्व रेखांश यांच्या दरम्यान आहे. सोलापूर जिल्हा हा समुद्र-सपाटीपासून १८०० फूट उंचीवर असलेल्या विस्तीर्ण मैदानाच्या केंद्रस्थानी येतो. जिल्हयाच्या दक्षिणेकडे विजापूर व गुलबर्गा हे कर्नाटक राज्यातील जिल्हे येतात तर नैऋत्येस सांगली जिल्हा, पश्चिमेस सातारा जिल्हा, वायव्येस पुणे जिल्हा, उत्तरेस अहमदनगर जिल्हा आणि पूर्वेस उस्मानाबाद जिल्हा आहे. सोलापूर शहर हे जिल्हयाचे मुख्यालय असून ते महाराष्ट्र राज्याचे विभागीय मुख्यालय असलेल्या पुणे या शहरापासून २६५ कि.मी. अंतरावर मुंबई-हैद्राबाद या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९ वर आहे. १८३८ मध्ये स्थापन झालेला सोलापूर जिल्हा १८६४ मध्ये विसर्जित होऊन त्याची पुनर्निर्मिती १८७५ मध्ये झाली. जिल्हयाचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १४,८४५ चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ४.८२ टक्के आहे. त्यापैकी २.२८ टक्के (३३८.८ चौ.कि.मी.) नागरी तर ९७.७२ टक्के ( १४,५०५.८ चौ.कि.मी.) ग्रामीण क्षेत्रफळ आहे. जिल्हयातील एकूण अकरा तालुक्यामध्ये १,०९० वसलेली खेडी व सहा ओसाड खेडी आहेत, १९८१ च्या जनगणनेनंतर बार्शी तालुक्यातील आठ गावे ही उस्मानाबाद जिल्हयात तर सांगोला तालुक्यातील एक गाव सांगली जिल्हयात समाविष्ट करण्यात आले.


SOLAPUR DISTRICT
ADMINISTATIVE DIVISIONS
KARMALA
BARSI
MADHA
MALSIRAS
MOHOL
NORTH SOLAPUR
PANDHARPUR
SOUTH SOLAPUR
AKKALKOT
MANGALWEDHA
SANGOLA
0 10 20 30 Kms.
DISTRICT BOUNDARY
TALUKA BOUNDARY
DISTRICT H.Q.
TALUKA H.Q.
MAHARASHTRA
Solapur
LOCATION MAP
0 100
Kms.
Solapur district
Barsi taluka

सोलापूर जिल्हयातील एक स्वतंत्र महसुली भाग म्हणून बार्शी तालुक्याची निर्मिती १९२० साली झाली असून जिल्हयातील एकूण अकरा तालुक्यापैकी बार्शी हा एक तालुका आहे. बार्शी शहर हे तालुक्याचे मुख्यालय असून बार्शी तालुका हा जिल्हयाच्या ईशान्य बाजूस आहे. तालुक्याचे मुख्यालय बार्शी नगर पालिकेचे क्षेत्रफळ १६.२७ चौ.कि. मी.असून १९८१ च्या जनगणनेनुसार बार्शी शहराची लोकसंख्या ७१,५३७ इतकी आहे. सोलापूर जिल्हयामध्ये भीमा ही प्रमुख नदी असून तिच्या उजवीकडील भागात नीरा, माण आणि डाव्या भागात सीना व भोगावती या उपनद्या आहेत. भीमा नदीची जिल्हयातील एकूण लांबी २८९ कि.मी. आहे.

## २.२ पीक पध्दती :

महाराष्ट्र राज्याच्या इतर जिल्हयाप्रमाणे सोलापूर जिल्हयात सुध्दा आर्थिक बाबतीत कृषी हा सर्वात जास्त महत्वाचा घटक आहे. जिल्हयातील ६८ टक्के लोकसंख्या उपजीविकेसाठी शेतीवरच अवलंबून आहे. जिल्हयातील बहुतेक व्यापार उदीम हे कृषी उत्पादनावरच आधारीत आहेत. जिल्हयात ज्वारी, बाजरी, तूर, भुईमूग, करडई, कापूस आणि ऊस ही पिके खरीप आणि रब्बी अशा दोन्ही हंगामात घेतली जातात. १९७१-७२ मध्ये जिल्हयातील एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ९० टक्के क्षेत्र लागवडीखाली होते. तालुकावार ते प्रमाण अर्थातच वेगळे होते. ज्वारी हे जिल्हयातील प्रमुख पीक आहे. सन १९८०-८१ मध्ये जिल्हयातील एकूण पिकाखालील क्षेत्रापैकी ५९.८५ टक्के क्षेत्र रब्बी ज्वारी खाली होते, त्याखालोखाल ५.९१ टक्के बाजरी, ४.७६ टक्के तूर, ४.१४ टक्के गहू तर ४.५६ टक्के क्षेत्र करडई पिकाखाली होते. म्हणून एकूण पिकाखालील क्षेत्रापैकी (१२,६५,६६३ हेक्टर) ७२.७४ टक्के क्षेत्र तृणधान्ये, १३.९४ टक्के कडधान्ये, ७.६० टक्के क्षेत्र गळिताच्या पिकाखाली

तर ऊसाखाली फक्त १·६१ टक्के क्षेत्र होते· एकूण पिकाखालील क्षेत्राचा विचार करता ते १९६०-६१ मध्ये ३७,००० हेक्टर, १९७०-७१ मध्ये ३३,००० हेक्टर, १९७८-७९ मध्ये ८२,००० हेक्टर तर १९८०-८१ मध्ये ८६,००० हेक्टर होते·

बार्शी बाजार क्षेत्रातील पीक लागवडीखालील क्षेत्राचा विचार केल्यास त्यामध्ये ज्वारी लागवडीखालील क्षेत्राचे प्रमाण सर्वाधिक आहे· १९७४-७५ साली ज्वारीखालील एकंदर क्षेत्र ५९,७४२ हेक्टर होते, १९७९-८० मध्ये रब्बी ९१,९५४ हेक्टर व खरीप २,४८० हेक्टर असे एकूण ९४,४३४ हेक्टर, १९८५-८६ साली रब्बी ७१,०४८ हेक्टर व खरीप १,२६९ हेक्टर असे एकूण ७२,३१७ हेक्टर तर १९८६-८७ साली ते ७७,२६१ हेक्टर होते· रोखीच्या पिकाखालील क्षेत्र वाढण्यास अपु-या सिंचन व्यवस्थेमुळे मर्यादा पडत आहे· जलसिंचनासाठी जिल्हयात उजनी प्रकल्पाशिवाय इतर कोणताही मोठा प्रकल्प अस्तित्वात नाही· उजनी प्रकल्पाची जलसिंचन क्षमता ही १५·६० लाख हेक्टर इतकी आहे· ती एकूण लागवडीच्या क्षेत्राच्या फक्त १३ टक्के आहे· अर्थातच जलसिंचन व्यवस्थेचा अभाव आणि पावसाची अनियमितता यामुळे शेती व्यवसाय हा एक अनिश्चित असा व्यवसाय बनलेला आहे· त्यामुळे जिल्हयात जास्त पाऊस पडणा-या क्षेत्रात व जेथे जलसिंचनाची सोय आहे अशाच ठिकाणी अधिक उत्पादन देणा-या बियाणाच्या जातींचा वापर तसेच रासायनिक खतांचा वापर केला जातो· वस्तुत: सोलापूर जिल्हा हा अवर्षण प्रवण क्षेत्रात येतो· १९७०-७१ व १९७३-७४ मध्ये जिल्हयातील बहुतेक सर्व खेडी टंचाईग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आली होती· नंतरच्या काळात ब-यापैकी पाऊस पडत गेल्याने शेतीक्षेत्रात समाधानकारक परिस्थिती निर्माण झालेली दिसते·

जिल्हयातील कृषी योग्य व हवामानाच्या दृष्टीने विचार केला असता १९६०-६१ ते १९८०-८१ या दोन दशकात जिल्हयातील बहुतेक लागवडीचे

क्षेत्र हे अन्नधान्याच्या पिकाखालीच होते. याच काळात अन्नधान्याच्या पिकाखालील क्षेत्रात लक्षणीय वाढ होऊन त्याची टक्केवारी ८९.७९ टक्क्यां-वरुन ९४.११ टक्क्यांपर्यंत पोचली आहे. परिणामत: अन्नधान्याव्यतिरिक्त इतर पिकाखालील क्षेत्रात घट झाली आहे. त्यामध्ये भुईमुगाच्या पिकाखालील क्षेत्रातील घट ही महत्वपूर्ण आहे. जिल्हयात एकूण लागवडीखालील क्षेत्रात भरड धान्याखालील क्षेत्राचे प्रमाण अधिक होते. १९६०-६१ ते १९८०-८१ या काळात भरड धान्याखालील क्षेत्रात ८१-८२ टक्क्यांनी वाढ झाली.

जिल्हयातील अन्नधान्याच्या पिकामध्ये मुख्यत: ज्वारी आणि त्या पाठोपाठ बाजरी आणि गहू या पिकांचा उल्लेख करता येईल. ज्वारी हे जिल्हयातील महत्वाचे भरड धान्य असून १९७१-७२ मध्ये त्याखालील एकूण क्षेत्र ६,९१,०८९ हेक्टर एवढे होते. ज्वारीचे पीक जिल्हयातील सर्व तालुक्यात सामान्यत: रब्बी हंगामात घेतले जाते. ज्वारीच्या पिकापासून रुचकर अन्न आणि उत्तम पशुखाद्य मिळते. शिवाय उत्पादन खर्चाच्या दृष्टीने ज्वारीचे पीक किफायतशीर आहे. ज्वारीचे पीक हे सुपीक व भारी काळ्या जमिनीत अधिक चांगल्या प्रकारे येते. त्यामुळे खरीप आणि रब्बी अशा दोन्ही हंगामात सुपीक व भारी काळ्या जमिनीत ज्वारीचे पीक घेतले जाते. खरीप ज्वारी-साठी ५०८ ते १०१६ मि.मी. पावसाची गरज असते. असे असले तरी ज्वारीचे पीक अपु-या पावसास समर्थपणे तोंड देऊ शकते तर योग्य पर्जन्यमानामध्ये भरपूर उत्पादन देऊ शकते. ज्वारी पेरणीसाठी व उत्तम उगवणीसाठी २ ते ३ इंच पाऊस उपयुक्त ठरतो. पण असा पाऊस जर पीक फुलो-यात असताना किंवा कणसात दाणे भरताना पडला तर तो हानीकारक ठरतो.

सोलापूर जिल्हयात खरीप आणि रब्बी हंगामात पेरल्या जाणा-या ज्वारीच्या अधिक उत्पादन देणा-या विविध जातीचा वापर केला जातो. उदाहरणार्थ - मालदांडी ३५-१, शाळू, दगडी, गुळबींडी(हुरडा खाण्यासाठी

चांगली) तसेच संकरित ज्वारीच्या सी·एस्·एच·-१, वसंत-५ आणि वसंत-९ या जातीचा वापर केला जातो· ज्वारीचे दर हेक्टरी, उत्पादन हे जमिनीच्या प्रतवारीनुसार आणि पर्जन्यमानानुसार वेगवेगळे असू शकते· ज्वारीच्या धाटांचा उपयोग विशेषत: दुभत्या जनावरासाठी हिरव्या चा-यासाठी म्हणून केला जातो· त्याला " कडब्‍ " असे म्हणतात· ज्वारी पासून महाराष्ट्रीय लोकाना प्रिय असलेली भाकरी व उत्तम पशुखाद्य मिळते· जिल्हयातील विविध पिकाखालील तालुकावार क्षेत्राचा विचार केला असता भरड धान्याखालील क्षेत्राचे प्रमाण सर्वत्रच अधिक आहे आणि त्यातही ज्वारीखालील लागवडीचे क्षेत्र सर्वात अधिक आहे· त्याला बार्शी तालुका अपवाद नाही·

तक्ता क्र· २·१

बार्शी तालुक्यातील विविध भरड धान्याखालील क्षेत्र

( क्षेत्र हेक्टरमध्ये )

| अ·नं· | धान्य | १९७४-७५ | १९७९-८० | १९८५-८६ | १९८६-८७ |
|---|---|---|---|---|---|
| १· | ज्वारी रब्बी | ५,९७४ | ९१,९५४ | ७१,०४८ | ७५,००७ |
| | ज्वारी खरीप | | २,४८० | १,२६९ | ४५९ |
| | | (२३·४३) | (९४·८०) | (९६·३४) | (९७·६७) |
| २· | बाजरी | ४,५१२ | ६०३ | २४३ | ३५७ |
| | | (१७·६९) | (०·६०) | (०·३२) | (०·४६) |
| ३· | साळी | २,३५० | १,१४६ | ५०६ | २८९ |
| | | (९·२१) | (१·१५) | (०·६७) | (०·३७) |

तक्ता क्र·२·१ पुढे चालू·

| अ·नं· | धान्य | १९७४-७५ | १९७९-८० | १९८५-८६ | १९८६-८७ |
|---|---|---|---|---|---|
| ४· | गहू | ९,२६० | २,१८३ | १,२४७ | ७२० |
| | | (३६·३१) | (२·१९) | (१·६६) | (०·९३) |
| ५· | जौड | १,२५९ | ४०५ | १४९ | ८४ |
| | | (४·९३) | (०·४०) | (०·१९) | (०·१०) |
| ६· | मका | २,१४१ | ६४२ | ५५२ | ३०४ |
| | | (८·०३९) | (०·६४) | (०·७३) | (०·३९) |
| ७· | वरई | १ | २०० | ४५ | ४१ |
| | | (०·००३) | (०·२०) | (०·०५) | (०·०५) |
| | एकूण ·· | २५,४९७ | ९९,६१३ | ७५,०५९ | ७७,२६१ |
| | | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

टीप : कंसातील आकडे एकूणाशी टक्केवारी दाखवितात·

आधार : कृषी उत्पादन बाजार समिती, बार्शी चे संबंधित वर्षाचे अहवाल·

तक्ता २·१ मध्ये दिलेल्या आकडेवारीवरून १९७४-७५, १९७९-८०, १९८५-८६ आणि १९८६-८७ या वर्षात भरड धान्याखालील क्षेत्रात झालेला बदल आणि एकूण भरड धान्यात ज्वारीचे प्रमाण अधिक असल्याचे स्पष्ट होते·

8734
A

संपूर्ण जिल्हयाचा विचार केला असता बार्शी आणि माढा तालुक्यात ज्वारीखालील क्षेत्राचे प्रमाण इतर तालुक्याच्या मानाने अधिक आहे. बार्शी तालुक्यात एकूण भरड धान्याखालील क्षेत्रामध्ये ज्वारीच्या लागवडी खालील क्षेत्राचा सिंहाचा वाटा आहे हे तक्ता क्र.१.१ वरुन स्पष्ट होते. १९६१-६२ ते १९७०-७१ या दशकात एकूण भरड धान्याखालील क्षेत्रात आणि ज्वारी खालील क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली. त्याचप्रमाणे याच काळात जिल्हयातील एकूण भरड धान्याचे उत्पादन आणि बार्शी जिल्हयातील एकूण भरड धान्याचे उत्पादन आणि बार्शी तालुक्यातील उत्पादनाची तुलना केली तर बार्शी तालुक्यात भरड धान्याचे उत्पादन अधिक चांगले होत असल्याचे तक्ता २.२वरुन आढळते.

तक्ता क्र. २.२

सोलापूर जिल्हा व बार्शी तालुक्यातील भरड धान्याचे उत्पादन

( लाख टन )

| वर्ष | सोलापूर जिल्हा | बार्शी तालुका | बार्शीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९६१-६२ | १,२१,३३८ | १६,६३४ | १३.७० |
| १९६४-६५ | १,५५,४१९ | २१,५३६ | १३.८५ |
| १९६७-६८ | १,८३,७२३ | ८६,७९५ | ४७.२४ |
| १९८०-८१ | 3,62,900 | 3·71 | - |
| १९८८-८९ | 8,26,600 | 9,26,980 | 30.00 |

आधार : (1) Gazetteer of India : Sholapur District, Government of Maharashtra, Bombay, P. 340.

2) तहसील कार्यालय बार्शी

बार्शी तालुक्यातील पीक रचनेचा संपूर्ण तपशील तक्ता २.१ मध्ये दिलेला आहे. त्यावरुन तालुक्यात ज्वारी हेच ख-या अर्थाने शेतक-याना आधार देणारे पीक असल्याचे स्पष्टपणे जाणवेल. त्याव्यतिरिक्त तूर वगळता इतर सर्वच पिकांचे स्थान अत्यंत गौण आहे. विशेष म्हणजे १९७६-७७ मध्ये भुईमुगाखाली असलेल्या लक्षणीय क्षेत्रात पुढील दशकभरात झपाटयाने घट झालेली आहे.

तक्ता क्र. २.१

कृषी उत्पादन बाजार समिती, बार्शीच्या क्षेत्रातील १९७६-७७ व १९८६-८७ या वर्षातील पीक लागवडीखालील क्षेत्र

( क्षेत्र हेक्टर मध्ये )

| अ.नं. | पीक | १९७६-७७ | १९८६-८७ |
|---|---|---|---|
| १. | ज्वारी | ८२,४०३ | ७५,४६६ |
| २. | बाजरी | ८०२ | ३५७ |
| ३. | साळी | १,७२४ | २८९ |
| ४. | गहू | १,७८५ | ७१९ |
| ५. | जोड | ३८२ | ८४ |
| ६. | मका | १,१९९ | ३०५ |
| ७. | वरई | ३० | ४१ |

तक्ता क्र·२·३ पुढे चालू·

| अ·नं· | पीक | १९७६-७७ | १९८६-८७ |
| --- | --- | --- | --- |
| ८· | हरभरे | २,६१४ | ७७१ |
| ९· | तूर | १४,५७९ | ८,१४३ |
| १०· | मूग | ५२६ | ४८६ |
| ११· | हुलगा | ३,८७० | ५९८ |
| १२· | उडीद | २११ | उपलब्ध नाही· |
| १३· | मिरची | १५५ | ३०७ |
| १४· | धणे | ४९ | १८ |
| १५· | हळद | १६५ | १०५ |
| १६· | ऊस | ७१४ | उपलब्ध नाही· |
| १७· | जवस | ५१४ | २७ |
| १८· | तीळ | २९१ | उपलब्ध नाही· |
| १९· | एरंडी | १०७ | १ |
| २०· | भुईमूग | ७,७५१ | २७० |
| २१· | करडई | ३,६९५ | ५४० |
| २२· | कारळे | ५०२ | उपलब्ध नाही· |
| २३· | आंबाडी | ७०७ | १५ |
| २४· | कापूस | ४१ | उपलब्ध नाही· |
| २५· | कांदा | ९९ | २७५ |
| २६· | मटकी | १,४८४ | उपलब्ध नाही· |
| २७· | लसूण | ९ | ७ |
| २८· | बटाटे | २ | उपलब्ध नाही· |
| **२९·** | **सूर्यफूल** | **उपलब्ध नाही·** | **३,५६६** |

आधार : कृषी उत्पादन बाजार समिती, बार्शी संबंधित वर्षाचे अहवाल·

## २·३ वाहतूक आणि दळणवळण

व्यापार व उद्योग यांच्या विकासासाठी आवश्यक असणा-या विविध बाबींमध्ये वाहतूक आणि दळणवळण ही एक महत्वाची बाब आहे· बार्शी हे शहर महत्वाच्या ठिकाणाशी रस्ते आणि लोहमार्गांनी जोडले गेले असून त्याला योग्य अशा दळणवळण साधनांची जोड दिलेली आहे· १९ व्या शतकाच्या शेवटीच बार्शीशहरात पोस्टाची व्यवस्था झाली तर १९०४ मध्ये कुर्डुवाडी बार्शी व १९११-१२ मध्ये बार्शी-लातूर नॅरोगेज रेल्वे मार्ग सुरु झाला· माल आणि प्रवासी वाहतूक यामध्ये रस्त्याचा सहभाग महत्वाचा असून बार्शी हे शहर रस्त्यानी मराठवाड्यातील उस्मानाबाद, बीड, औरंगाबाद, नांदेड, परभणी व लातूर या महत्वाच्या शहराशी तसेच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापूर व पुणे या शहराशी जोडलेले आहे· महाराष्ट्रराज्यातून जाणारा मुंबई ते हैद्राबाद हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९ बार्शी शहरापासून १२५ कि·मी· अंतरावरुन जातो· बार्शी शहरातून मिरज ते लातूर हा नॅरोगेज लोहमार्ग जातो· त्याचप्रमाणे मुंबई ते मद्रास हा मध्य रेल्वेचा ब्रॉडगेज मार्ग बार्शी शहरापासून ३६ कि·मी· अंतरावर असलेल्या कुर्डुवाडी शहरावरुन जातो· एकंदरीत, बार्शीला ब-याच वर्षापासून वाहतूक आणि दळणवळण सुविधांचा चांगला लाभ झालेला आहे·

## २·४ औद्योगिक आणि व्यापारी उलाढाली

सोलापूर जिल्हयात एकूण दोन औद्योगिक वसाहती असून एक सोलापूर शहरात तर दुसरी बार्शीशहरात आहे· बार्शी शहरापासून जवळच असलेल्या यांडवी या गावी अलिकडेच एक अभियांत्रिकी उद्योगसंस्था उदयास येत आहे·

त्यामधून नटबोल्ट्स आणि शेती अवजारांचे उत्पादन लवकरच होऊ लागेल. १९७९ पासून बार्शी तालुक्यातील इर्ले वैराग या गावी भोगावती शेतकरी सहकारी साखर कारखाना सुरु झाला आहे. याशिवाय बार्शी शहरात तेल गिरण्या, विडी उद्योग, गूळउद्योग, छपाई उद्योग, कापड गिरणी, सूतगिरणी, मसाला उद्योग आणि डाळ उद्योग चालू आहेत. यावरुन सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, बार्शी शहरातील औद्योगिक वाढ ही बव्हंशी कृषी उत्पादनाशी निगडित आहे. तक्ता क्र.२.४ मधील तपशील यादृष्टीने बोलका ठरेल.

तक्ता क्र. २.४

बार्शी क्षेत्रातील कारखानदारी

| अनुक्रमांक | उद्योग प्रकार | संख्या | |
|---|---|---|---|
| | | १९८५-८६ | १९८६-८७ |
| १. | सूत गिरण्या | २ | २ |
| २. | शेंगा फोडण्याची यंत्रे | ३ | ३ |
| ३. | कापड गिरण्या | १ | - |
| ४. | हळद सफाई यंत्रे | २ | २ |
| ५. | डाळ कारखाने | २० | ३२ |
| ६. | कडबा कुट्टी यंत्रे | ५ | १० |
| ७. | तेल गिरण्या(एक्स्पेलर्स) | १२ | १६ |
| ८. | तेल घाणी (रोटरी) | ८ | ७ |
| ९. | साखर कारखाना | १ | १ |

आधार : कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी, संबंधित वर्षांचे वार्षिक अहवाल.

सोलापूर जिल्हयातील बार्शी शहर हे एक महत्वाचे व्यापारी केंद्र आहे. सोलापूर शहरानंतर जिल्हयातील बार्शी हेच मोठे व महत्वाचे व्यापारी केंद्र आहे. बार्शी शहरात कारखानदारी बरोबरच इतर अनेक लहान मोठे उद्योग व विविध व्यापारी उलाढाली करणा-या संस्था आहेत. यामध्ये विविध प्रकारची दुकाने, व्यापारी संस्था, हॉटेल्स इत्यादींचा समावेश करता येईल. या विविध व्यवसायात अनेक व्यक्तींना रोजगार संधी प्राप्त झालेली आहे. तक्ता क्र.२.५ मध्ये बार्शी शहरातील वरील विविध संस्थांची संख्या व त्यामधील रोजगार यांचा तपशील दिला आहे.

तक्ता क्र. २.५

बार्शी शहरातील व्यवसाय व त्यामधील रोजगार

| अनुक्रमांक | व्यवसाय प्रकार | १९७६-७७ | | १९८३-८४ | |
|---|---|---|---|---|---|
| | | नोंदवलेल्या संस्था | कामगार संख्या | नोंदवलेल्या संस्था | कामगार संख्या |
| १. | दुकाने | १,७५७ | १,७७१ | २,१९२ | ३,२६८ |
| २. | व्यापारी संस्था | ५०४ | १,४४० | ६१५ | १,९०५ |
| ३. | कारखाने | उपलब्ध नाही. | उपलब्ध नाही. | २३५ | उपलब्ध नाही. |
| ४. | हॉटेल्स | १७३ | ५५२ | २७१ | ७५९ |
| ५. | इतर | ३४ | ६६ | ४२ | १०२ |

आधार : बार्शी म्युनिसिपल कौन्सिल, इयर बुक - १९७६-७७ व १९८३-८४.

## २.५ बॅन्का आणि सहकारी संस्था

बार्शी शहर हे सोलापूर जिल्हयातच नव्हे तर महाराष्ट्रातील एक महत्वाचे व्यापारी केंद्र म्हणून प्रसिध्द आहे. साहजिकच बॅन्किंग व्यवसाय करणा-या १८ संस्था बार्शी शहरामध्ये आहेत., त्यापैकी राष्ट्रीयकृत बॅन्कांची कार्यालये सहा असून बाकी कार्यालये खाजगी बॅन्कांची आहेत. या शिवाय ११ सहकारी बॅन्कांची कार्यालये आहेत.

सहकारी क्षेत्रातही बार्शी शहर जिल्हयात आघाडीवर आहे. बार्शी शहरातील कांही महत्वाच्या सहकारी संस्था पुढील प्रमाणे आहेत :

(१) बार्शी तालुका सहकारी खरेदी विक्री संघ.
(२) बार्शी बृहत् वि.का.से.सहकारी संस्था
(३) सर्व व्यवसायी श्री.भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि.
(४) कर्मवीर कृषी विज्ञान सेवा सहकारी संस्था लि.,
(५) भगवंत सहकारी डाळ प्रक्रिया संस्था मर्यादित,
(६) महाराष्ट्र राज्य सहकारी विपणन महासंघ, शाखा-बार्शी.

सध्या बार्शी तालुक्यात असलेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची एकूण संख्या व त्याचे ग्रामीण आणि नागरी भागातील विभाजन यांची थोडक्यात कल्पना तक्ता क्र.२.६ वरुन येउ शकते. त्यामध्ये १९७९ ते १९८९ या काळात विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची संख्या ८ ने कमी झालेली दिसते. त्याचे कारण १९८१ च्या जनगणनेनंतर बार्शी तालुक्यातील कांही गावे उस्मानाबाद जिल्हयात गेल्याने ८ वि.का.से.सहकारी संस्थाही उस्मानाबाद जिल्हयात गेल्या. त्यामुळे १९७९ मध्ये या संस्थांची असलेली एकूण संख्या ही १२३ वरुन १९८८-८९ मध्ये ती ११५ पर्यंत कमी झाली. इतर प्रकारच्या संस्थांमध्ये मात्र थोडी वाढ झालेली आहे. १९८८-८९ मध्ये बार्शी

तालुक्यात एकूण ३२५ सहकारी संस्था होत्या. त्यांची ग्रामीण व नागरी भागात झालेली विभागणी तक्ता क्र.२.६ मध्ये दिलेली आहे.

तक्ता क्र. २.६

बार्शी तालुक्यातील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची

एकूण संख्या आणि ग्रामीण/शहरी विभागणी

( १९८८-८९ )

| अनुक्रमांक | सहकारी संस्थांचा प्रकार | एकूण संख्या | ग्रामीण संस्था | शहरी संस्था |
|---|---|---|---|---|
| १. | वि.का.से.सहकारी संस्था | ११५ | ११४ | १ |
| २. | पगारदार व नागरी सहकारी पत संस्था | ३७ | ८ | २९ |
| ३. | मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था | २१ | २० | १ |
| ४. | मजूर सहकारी संस्था | ४७ | ३४ | १३ |
| ५. | ग्राहक सहकारी संस्था | १८ | ३ | १५ |
| ६. | औद्योगिक सहकारी संस्था | ४१ | ९ | ३२ |
| ७. | गृहनिर्माण सहकारी संस्था | २५ | ७ | १८ |
| ८. | कुक्कुट पालन सहकारी संस्था | ५ | ५ | -- |
| ९. | शेतीमाल प्रक्रिया सहकारी संस्था | ६ | ३ | ३ |
| १०. | सहकारी विपणन संस्था | १ | -- | १ |
| ११. | सहकारी पाणी पुरवठा संस्था | २ | २ | -- |
| १२. | शेतकरी सहकारी संस्था | २ | २ | -- |
| १३. | इतर सहकारी संस्था | ५ | -- | ५ |
| | एकूण सहकारी संस्था .. | ३२५ | २०७ | ११८ |

आधार : दुय्यम निबंधक,सह.संस्था,बार्शी यांच्याकडील कार्यालयीन माहितीवरुन

आतापर्यंतची सर्व माहिती एकत्रितपणे ध्यानात घेतल्यास बार्शी तालुका हे ज्वारीचे आगर आहे असे म्हणता येईल. सर्व पिकात या पिकाला प्राधान्य असल्याने साहजिकपणेच तालुक्यातील शेतीमाल विपणन व्यवस्थेत ज्वारीला सिंहाचा वाटा लाभलेला आहे. याचबरोबर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. या तालुक्यात सहकारी विपणन संस्थांची संख्या केवळ एकावर मर्यादित असल्याने ज्वारीच्या विपणन व्यवस्थेत सहकाराचा वाटा नगण्यच असला पाहिजे.

=0=0=0=0=0=